।। श्रम ही आराधना ।।

# महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ

(संलग्न भारतीय मजदूर संघ) (र.नं.पी.एन.३९७८)

निलेश खरात अध्यक्ष मो.: ९८२२४९८३९५
सचिन मेंगाळे सरचिटणीस मो.: ९४२२०३७०२९
उमेश आणेराव कार्याध्यक्ष मो.: ९९७०००४४७४
राहुल बोडके संघटन मंत्री मो.: ९५५२८७४८२१
सागर पवार कोषाध्यक्ष मो.: ९८९०१६९६६७

● mvkksangh@gmail.com ● विश्वकर्मा भवन, १८५, शनिवार पेठ, पुणे - ४११०३० ● www.mvkksangh.com


जा. क्र.: एम.व्ही.के.के.एस./एन/2019/11

Central Registry Unit MSEDCL, Prakashgad, Bandra (E), Mumbai Received 12/7/19

दिनांक : 11/07/2019

प्रति,
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य
मंत्रालय मुंबई

प्रति,
उर्जामंत्री, महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई ३२

प्रति,
मा. व्यवस्थापकीय संचालक
महावितरण,
प्रकाशगड, बांद्रा, मुंबई

12/6/19

मंत्री, ऊर्जा, नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्य उत्पादन शुल्क यांचे कार्यालय महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

**विषय : विद्युत सहाय्यक आणि उपकेंद्र सहाय्यक या ७००० पदांच्या भरती प्रक्रियेमध्ये वीज कंत्राटी कामगारांवर झालेल्या अन्याया विरोधात आंदोलन.**

महोदय,

महावितरण कंपनीची स्थापना होण्यापूर्वी पासून रिक्त पदांच्या जागेवर अत्यंत तुटपुंज्या वेतनात तसेच कंत्राटदारांच्या आर्थिक शोषणच्या विळख्यात वीज कंत्राटी कामगारांनी काम केले आहे. गेली १५ वर्षे महावितरण कंपनीच्या महसुलात वाढ करुन तीचा नावलौकिक करण्यामध्ये वीज कंत्राटी कामगारांचा मोलाचा वाटा आहे.

रिक्तपदांच्या जागेवर कंत्राटी कामगारांची नियुक्ती केल्यामुळे वीज कंपनीच्या महसुला मध्ये मोठी भर पडली आहे. कायम कामगारांचे वेतन व कंत्राटी कामगारांना दिले जाणारे किमान वेतन यातील १५ वर्षांचा फरक पाहिला असता ही रक्कम अब्जावधी रुपयांमध्ये गेली असून एवढ्या रकमेचा वीज कंपनीस नक्कीच फायदाच झालेला आहे. मात्र वीज कंत्राटी कामगारांनी आजपर्यंत केलेल्या कामाची दखल वीज कंपनी प्रशासनाने व शासनाने आज तागायत घेतली नाही. सन २०१५ पासून आज मिती पर्यंत महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाने मा. मुख्यमंत्री, मा.उर्जामंत्री, महाराष्ट्र शासन आणि वीज कंपनी प्रशासनाशी दिनांक १० जुलै २०१९ पर्यंत अेनक वेळा चर्चा आंदोलने या माध्यमातून राज्यातील वीज कंत्राटी कामगारांना न्याय मिळण्याच्या दृष्टने अतोनात प्रयत्न केले मात्र आज पर्यंत आश्वासना व्यतिरीक्त कोणत्याही प्रकारे कंत्राटी कामगारांना न्याय देण्यास मा. मुख्यमंत्री, मा.उर्जामंत्री, महाराष्ट्र शासन आणि वीज कंपनी प्रशासन पूर्णत: अपयशी ठरले आहेत. आज रोजी विद्युत सहाय्यक आणि उपकेंद्र सहाय्यक या पदांची भरती काढल्या मुळे आज रोज या रिक्त पदांवर कार्यरत असलेल्या ७००० कंत्राटी कामगारांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळणार असल्या मुळे महाराष्ट्रातील सर्व कंत्राटी कामगारांच्या पाठीमध्ये खंजीर खुपसल्याची भावना होऊन त्यांच्यामध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर १० जूलै २०१९ रोजी मंत्रालयात मा. उर्जामंत्री आणि व्यवस्थापकिय संचालक, महावितरण, यांच्याशी चर्चा झाली असून मा.उर्जामंत्री महोदय यांनी व्यवस्थापकिय संचालक, महावितरण यांना महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची येत्या ७ दिवसांमध्ये बैठक घेऊन या अन्यायग्रस्त कंत्राटी कामगारांना या भरती प्रक्रिये मध्ये कशा प्रकारे न्याय देता येईल या बाबत सुचित केले आहे. ही बैठक होऊन या वीज कंत्राटी कामगारांना योग्य व अपेक्षीत असा न्याय न मिळाल्यास महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघाच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल व त्या बाबतची नोटीस लवकरच वीज कंपनी प्रशासनास देण्यात येईल. याची शासन व प्रशासनानी दखल घ्यावी ही विनंती.

मुख्यमंत्री सचिवालय
महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक 12/7/19

महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ नोंदणी क्र. पी.एन./३९७८

आपला
निलेश खरात
अध्यक्ष - महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ